13) 2016

MR 2016-17

ISBN- 978-93-84021-57-3

विदर्भ मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

नोंदणी क्रमांक - महा. ३३४/१०/चंद्रपुर

# समाजशास्त्रीय संशोधन पत्रिका

वर्ष - ३ रे अंक ५ वा जुलै-डिसेंबर - २०१६ किंमत : रु. ६०/-

पंचायतराज व्यवस्था आणि महिलांचे सक्षमीकरण -- प्रा.डॉ.बी.एम. कन्हाडे

वर्तमानकालीन विद्यार्थ्यांच्या समस्या -- प्रा. डॉ. किशोर राऊत

बालकामगार : एक ज्वलंत सामाजिक समस्या -- प्रा. डॉ. श्रीकांत गायकवाड

स्त्रीभ्रूण हत्या : भारतीय समाजातील एक ज्वलंत समस्या -- सहा. प्रा.विद्या भैसारे

जोडीदार निवडतांना -- प्रा. मेघराज आर. शिंदे

बंजारा जमातीच्यां आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक समस्या एक अध्ययन -- प्रा. सिध्दार्थ बी. टेंभुर्णे

330



166

Scanned by TapScanner

# जोडीदार निवडतांना

प्रा. मेघराज आर. शिंदे
समाजशास्त्र विभाग,कल्या व विज्ञान महिला महाविद्यालय
मेहकर जि. बुलढाणा मो. ९८९०१९३३१५

विवाह संस्थेला ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. माणूस या पृथ्वीवर दहा हजार लाख वर्षापासून एक दुसऱ्यासोबत जगण्याचा प्रयत्न करीत आहे. गेल्या पाच हजार वषापसून मानवालां सांस्कृतिक इतिहास आहेत. विवाह संस्थेलाही संस्कृतीचा आधार आहे. विवाह संस्था ही सतत संस्कृतीच्या संक्रमणाबरोबर बदलत आलेली आहे.

विवाह संस्थेचा इतिहास या ग्रंथात राजवाडे यांनी विवाह संस्थेवर व्यापक लिखान केले आहे. मानवी विकासाच्या पहिल्या अवस्थेत समूह विवाह अस्तित्वात होता. त्यानंतर बहुविवाह, बहुपत्नी, बहुपती, एक विवाह असे विवाहाचे प्रकार अस्तित्वात आले. सद्या एक विवाह पध्दत अस्तित्वात आहे. वेस्टन मार्क या समाज शास्त्रज्ञाने एक विवाह पध्दतीला सर्वश्रेष्ठ मानले आहे.

कुटुंब संस्था व विवाह संस्था या मुलभूत 'सामाजिक संस्था' आहेत. या दोन्ही संस्था सार्वत्रिक स्वरुपाच्या आहेत. विवाहातून कुटुंबाची निर्मिती होते. कुटुंबातून समाजाला नवीन सदस्य मिळतात. व्यक्ती मृत आहेत समाज जिवंत आहे. त्यामुळे या दोन्ही संस्थामुळे संस्कृतीचे हस्तांतरण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होते. त्यामुळे या दोन्ही संस्थामुळे संस्कृतीचे हस्तांतरण एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे होते. त्यामुळे या दोन्ही संस्थानचे महत्व अनन्य साधारण आहे. परंतु या दोन्ही संस्था मध्ये आमुलाग्र बदल होत आहे. मध्यम वर्गात घटस्फोटाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. शिक्षणातील बदल, नविन विचारसरणी, मूल्यातील बदल, नोकरी इत्यादी कारणामुळे या संस्थामध्ये बदल होत चालला आहे.

**विवाहाचा उद्देश :**

हिंदू धर्मानुसार विवहाचे प्रजोत्पादन व बालसंगोपन, लगिक गरजांची पूर्तता, संस्कृती व धर्माचे रक्षण इत्यादी उद्देश आहे.

**१. प्रजोत्पादन व बालसंगोपन :**

प्राचीन काळापासून भारतीय समाजात विवाहाचा उद्देश हा प्रजोत्पादन व बालसंगोपन हा राहीला आहे. यातून समाजाचे सातत्य टिकून राहते. आधुनिक काळात यात बदल झाला आहे. विवाहाचे वय वाढले आहे. पती पत्नी यांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण झाले आहे. एकेकाही मूलांचे नाव काय ठेवावे यावरून वाद होत होते आता मुलगा हवा की नको यावरून



330



Scanned by TapScanner

वाद होतो, कधी अपत्य होऊ द्यावेत, किती होऊ द्यावेत यावर दोघांचे एकमत होत नाही त्यामुळे या उद्देशात बदल होत चालला आहे.

**२. लगिक गरजांची पूर्तता :**

लगिक गरजांची पूर्तता करणे हा विवाह संस्थेचा प्रमुख उद्देश आहे. मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा आहे. याचप्रमाणे मानवाची लगिक गरजही मूलभूत स्वरुपाची आहे. विवाह संस्थेच्या माध्यमातून लगिक गरजाची पूर्तता समाजमान्य पध्दतीने पूर्ण केल्या जातात. त्यामुळे समाजाचे स्वास्थ टिकून राहते. सद्या धावपळीचे जीवन, मानसिक ताणतणाव, व्यसनाधिनता, विचलित वर्तन यामुळे मानवाच्या लगिक गरजा पूर्ण होत नाहीत. घटस्फोटाचे सर्वात जास्त जबाबदार कारण लगिक गरजांची पुर्तता न होणे हेच आहे. हे अनेक संशोधनानी सिध्द झाले आहे.

**३. संस्कृतीचे संवर्धन व धर्माचे पालन :**

भारतीय समाजात अविवाहीत राहण्याला महत्व राहिलेले नाही. विवाह करणे म्हणजे धर्माचे पालन करणे होय. असा अर्थ भारतीय समाजात काढला जातो. त्यामुळे अविवाहित राहणाऱ्याचे प्रमाण पाश्चात्य देशाच्या तुलनेत कमी आहे. त्यातल्या त्यात स्त्रियांचे प्रमाण अल्प आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे विवाह करणे म्हणजे धर्माचे पालन करणे होय. संस्कृतीचे पालन करणे होय. परंतु लोकांवर धर्माचा व संस्कृतीचा प्रभाव फारसा दिसत नाही. त्यामुळे विवाह संस्था धोक्यात येत आहे.

**जोडीदार निवडतांना या गोष्टी टाळाव्यात :**

आपल्या मुलीचे लग्न जुळवणे हे आईवडिलांसाठी समस्या बनली आहे. सद्या मूला-मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. ते स्वतंत्र नोकरी करीत आहेत. त्यामुळे बरोबरीचे स्थळ जुळविणे आवश्यक असते. लग्न जुळवितांना अनेक गोष्टी लक्षात घेतल्या जातात. खालील गोष्टी टाळल्या तर विवाह संस्था टिकून राहे शकते.

**१. जात :**

जात मानने न मानने हे ज्याचा त्याचा प्रश्न आहे. स्वातंत्र्यानंतर जातीव्यवस्था कमी होण्याऐवजी वाढत गेली आहे. जातीय संघटना निर्माण झाल्या. जातीय विवाह मेळावे निर्माण झाले. जातीभावना जागृत झाली. त्यामुळे विवाह जातीनुसार लावले जात आहेत. जातीत विवाह केला तरी चालेल परंतु जातीत पोटजाती, उपजाती पाहून विवाह केल्यामुळे हुंडा पध्दत वाढत चालली आहे. यामुळेही योग्य स्थळ मिळत नाही व घटस्फोट होतात.

**२. प्रतिष्ठा :**

विवाह जुळवतांना बऱ्याच प्रमाणात प्रतिष्ठेला महत्व दिले जाते. याचा उल्लेख पार्टी असा केला जातो. पार्टी कितीही मोठी असली



Scanned by TapScanner

तरी दुसऱ्यांना किती सामावून घेते यावर विवाहाचे अस्तित्व अवलंबून असते. अनेक वेळा मुलीच्या किंवा मुलाच्या गरीबीवर बोलले जाते. त्यामुळे घटस्फोट होतात.

### ३. संपत्ती :

संपत्तीचा विचारही विवाहाच्या वेळी महत्वाचा मानला जातो. मुलाच्या वाट्याला काय येते ? याचा विचार केला जातो. मुलगी वरच्या वर्गात देण्याचा हा प्रयत्न संपत्तीच्या माध्यमातूनच केला जातो. परंतु वेगळ्या वर्गात मुलगी किंवा मुलगा एकरूप होऊ शकत नाहीत याचा कोणीही विचार करीत नाहीत. आर्य चाणक्य याने चाणक्य नितीमध्ये विवाह आपल्या वर्गात करावा असे म्हटले होते. याचे कारण नवीन वर्गात एकरूप न होणे हेच आहे.

### ४. पत्रिका पाहणे :

आधुनिकीकरण, नागरीकरण, विज्ञान तंत्रज्ञान यात खूप मोठ्या प्रमाणात बदल झाला, परंतु समाजात फारसा बदल झालेला आढळून येत नाही आजही विवाह पत्रिका पाहून जुळविले जातात, मोडले जातात. पत्रिकेच्या आधारे शनि, मंगळ, राहु, केतू लोकांना आडवे येतात. राहु कतुच्या आधारे लग्न जुळविण्याची आज काहीच गरज नाही.

जोडीदार निवडतांना खालील गोष्टी लक्षात घ्याव्यात :

### स्वभाव :

मुलगा-मुलगी शोधतांना स्वत: निवडकर्ते किंवा पालक हे मुलगा किंवा मुलगी यांच्या बाह्य दिसण्याकडे पाहतात. या आधारे निवड करतात. त्यामुळे पुढे फसगत होते. मानसशास्त्रज्ञ सिगमंड फाईड यांच्या मते, दोन भिन्न लिंगी व्यक्ती सतत संपर्कात राहिल्यास त्यांच्यात आकर्षण निर्माण होणे साहाजिक आहे. याप्रमाणे आकर्षनाच्या आधारे विवाह केले जातात. विवाहानंतर खऱ्या स्वभावाची ओळख होते. तेव्हा वेळ निघून गेलेली असते. त्यामुळे योग्य वेळी स्वभाव जुळतो का नाही हे पाहणे गरजेचे असते. एका हिंदी गाण्याच्या आधारे स्वभावाचे वर्णन चांगल्या पध्दतीने करता येते.

*दिल को देखो चेहरा न देखो*
*चेहरे ने लाखो को लुट*
*दिल सच्चा और चेहरा झुठा ....*

### कौटूंबिक पार्श्वभूमी :

कौटूंबिक पार्श्वभूमीमध्ये लोक कुटूंबातील सदस्यांची संख्या भाऊ बहीण इत्यादी पाहिले जाते.

बऱ्याच वेळा योग्य स्थळ असुन सुध्दा ते खेड्यात राहतात म्हणुन विवाह टाळला जातो. विवाह यशस्वी होण्यासाठी व्यक्तीचे वर्तन महत्वाचे असते. परंतु प्रत्यक्षात लोक ग्रामीण की शहरी याचे विश्लेषण करतात आणि फसतात. उलट



Scanned by TapScanner

शहरातच घटस्फोटाचे प्रमाण जास्त आहे. याबरोबरच कुटुंबातील लोक काय बोलतात, कसे वागतात याकडे लक्ष दिले पाहिजे. मी एकदा वर्तमान पत्रात बातमी वाचली होती. त्यामध्ये मुलांकडील व्यक्तींनी दागिने तयार झाले असे मुलींकडच्या व्यक्तींना फोन करुन सांगितले. त्या वेळी समोरच्या पार्टीने ते दागिने नकली आहेत का हे पाहावे लागेल असे म्हटले योग्य वेळी समोरच्या व्यक्तीची सुटका झाली. अशा प्रकारच्या छोट्यामोठ्यां गोष्टीवरुन वादंग निर्माण करणाऱ्या कुटुंबापेक्षा साधारण कुटुंब कधीही योग्य.

**इच्छा, आकांक्षा :**

जोडीदार निवडतांना इच्छा, आकांक्षा यांनाही महत्व द्यायला हरकत नाही. दोघांच्या इच्छा आकांक्षा जुळतात का ? ते पाहिले पाहिजे. बऱ्याच प्रमाणात स्त्रियांची नोकरी करण्याची इच्छा नसते तेव्हापती काही करुन नोकरीच्या शोधात असतो. पत्नीला नोकरी करावी लागते. तर काही वेळा पतीची इच्छा नसते पत्नीने नोकरी करु नये. त्यावेळी नवरा सोडायला तयार असते. परंतु नोकरी सोडावयास तयार नसते. अशाप्रकारे समन्वय साधला नाही तर भविष्यात खटके उडतात.

**विचारसरणी :**

विवाह संबंध टिकविण्यामध्ये विचारसरणी महत्वाची असते. दोघांचीही विचार करण्याची पध्दत वेगवेगळी असेल तर विवाहला तडे जातात. सध्या भोगवाद, भौतिकवाद, चंगळवाद बोकळला आहे. वाटेल त्या मार्गाने लोक पुढे जाण्याचा प्रयत्न करतात. एक समाजासाठी जगतो दुसरा स्वार्थासाठी, एक खाण्यासाठी जगतो दुसऱ्या जगण्यासाठी खातो एक आध्यात्मीक दुसऱ्या भौतीकवादी. एक प्रसिध्दीसाठी वाटेल ते करणारदुसरा प्रसिध्दीपासुन दूर राहणार. परस्पर विरोधी स्वभावाने घटस्फोट होतात. त्यामुळे आवडीनिवडी विचार एकसारखे असावे लागतात. उदा. डॉ. अनिल अवचट व त्यांची पत्नी, डॉ. अभय- डॉ. राणी बंग, डॉ. रविंद्र-डॉ. स्मिता कोल्हे, माया चंद्रकांत वानखेडे, बाबा-साधनाताई आमटे इ. दांपत्ये स्वभाव विचार जुळल्यामुळे आदिवाशी क्षेत्रात दुर्गम भागात आनंदी जिवन जगत आहेत.

**लग्नाच्या वेळी घाई करु नये :**

अनेक वेळा असे घडते की, लग्नांच्या वेळी घाई केली जाते. कोणाचाही विश्वास प्राप्त करण्याअगोदर कमी दिवसात लग्न केले जाते. त्यामुळे अनेक चुका घडतात. अशा प्रकारचे अनेक उदाहरणे समाजात आढळून येतात. कुठेतरी एखादा मुलगा किंवा मुलगी आवडली म्हणून त्या व्यक्तीसोबत विवाह करण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु त्या व्यक्तीचे दुसऱ्यासोबत प्रेम संबंध असतात. अशावेळी योग्य स्थळ आहे म्हणुन जुने संबंध लपवले जातात व विवाह

समारंभ थाटात पार पाडला जातो. नंतर सहा महिन्यातच खरे रुप समोर येते. त्यावेळी आम्ही तुमच्याकडे आलो नव्हतो, तुम्हीच आमच्याकडे आले होते. अशा प्रकारचे वाद होतात. घाईत झालेले लग्न घाईत मोडले जाते.

**वय :**

प्रजोत्पादन क्षमताही ४० ते ४५ वर्षापर्यंत असल्यामुळे मुलीचे वय मुलापेक्षा कमी असावे असा संकेत आहे. लग्न जुळवतांना वय हा घटक महत्वाचा मानला जातो. मुलगा व मुलगी यांच्या वयात फार तर पाच वर्षाचे अंतर असावे. याचे दुसरे कारण वय विचार करण्याची पध्दती यात साम्य असणे. दोघापैकी एका सदस्याचे वय जास्त असेल तर त्याचा परिणाम कुटूंबावर होतो व घटस्फोट होतो.

**पत्रिकेला कमी महत्व :**

पत्रिकेतील किती गुण जुळतात याचा शोध ब्राम्हणाकडून घेतला जातो. याचा व जीवनाचा अर्थाअर्थी काहीही संबध नाही. यापेक्षा मुलगा-मुलगी याचे विचार जुळतात का ? सासू व सुन यांचे विचार जुळतात का ? हे पाहणे गरजेचे आहे. हे जुळल्यास राहू, केतू आडवे आले तरी काही फरक पडत नाही.

**गोत्र, अनुवंशशास्त्र :**

अनुवंशशास्त्रानुसार तीन पिढ्यात रक्ताचे नाते असल्यास अशा व्यक्तीशी विवाह करु नये. विविध आजार त्यातून होण्याची शक्यता असते. याबरोबर गोत्र विवाह करु नये. एका गोत्रात विवाह करु नये असे संस्कृतीत म्हटले आहे.

**परिचय विवाहापेक्षा प्रेम विवाब बरा :**

सर्व जातीचे विवाहविषयक परिचय मेळावे घेतले जातात. या परिचयातून विवाहाला सामोरे जाणे अवघड असते. एका भेटीत जीवनासंबंधीचा विचार करणे अवघड असते. यापेक्षा प्रेम विवाहात अनेक वेळा व्यक्तीची चांगली ओळख तरी होते. त्यामुळे परिचयापेक्षा दीर्घ परिचयाला महत्व द्यावे.

**जोडीदाराच्या शारीरिक तपासण्या :**

विवाह करतांना व्यक्ती आयुष्याचे स्वप्न बांधत असतो. त्यामुळे ज्या व्यक्तीशी विवाह करायचा त्या व्यक्तीची शारीरिक, मानसीक चाचणी होणे गरजेचे आहे. साधे आपल्याला टिव्ही, फ्रिज घ्यायचे असेल तर आपण चार ठिकाणी चौकशी करतो. हा तर आयुष्याचा निर्णय आहे. एड्स चाचणी न केल्यामुळे अनेकावर विधुर किंवा विधवा होण्याची वेळ आली आहे. मी एक वेळा ई-टिव्हीवरील जीवन ऐसे नाव या कार्यक्रमात प्रत्यक्षात एका स्त्रीचे अनुभव ऐकले आहेत. त्या स्त्रीच्या मते तीचा जीवन साथी दुर्धर आजाराने त्रस्त होता. तो सतत औषधी घेत होता. तो दवाखान्यात जात होता. परंतु घरचे लोक त्या मुलीला त्याच्या

विषयी त्याच्या आजाराविषयी काहीच सांगत नव्हते. एक दिवस त्याचे निधन झाले. अकाली वैधव्य त्या स्त्रिवर आले. अशा प्रकारचे वैधव्य अनेक व्यक्तीवर चौकशी न केल्यामुळे येते. लग्नाच्या वेळी आरोग्य तपासणी आवश्यक आहे. अशा प्रकारचा सवाल शंभर वर्षापूर्वी र.धो. कर्वे यांनी संतती नियमन या साप्ताहिकाद्वारे केला होता. त्याचे पालन आजही केले जात नाही. स्वच्छता, त्वचेची दुर्गंधी, अवघड जागेची निगा इ. विषयी वैद्यकीय सल्ला आजही घेतला जात नाही.

**इगो व महत्वाकांक्षा :**

शेक्सपिअर या ब्रिटीश तत्वज्ञानाच्या मते लग्नाच्या गाठी स्वर्गात जुळतात. परंतु इगोमुळे या गाठी टिकल्या जात नाहीत. विवाह जुळतांना इगो व महत्वाकांक्षा याचाही विचार करणे गरजेचे आहे. बऱ्याच वेळा छोट्या छोट्या कारणाने घटस्फोट झालेले आहेत. याचे सर्वात महत्वाचे कारण इगो हेच ठरते. माझे ते बरोबरच इतरांचे ते चुक अशा प्रकारची भावना कुटूंबाचा शेवट करते. शेवटी मला चंद्रशेखर गोखले यांच्या ओळी सांगाव्या वाटतात.

'इमारत बांधायला वेळ लागत नाही
घर बांधायला वेळ लागतो.
घरासाठी दोन जिवांचा खराखुरा मेळ लागतो.'

या कवीच्या ओळीतला जीवनविषय दृष्टीकोन नव्या पिढीने घ्यावा.

**संदर्भ ग्रंथसुची :**


१. सामाजिक संरचना आणि समस्या ———— डॉ. प्रदिप आगलावे
साईनाथ प्रकाशन, नागपुर

२. आनंदी वैवाहिक जीवन ———— डॉ. दिपक केळकर
मनोविकास प्रकाशन,पुणे

३. विवाह संस्थेचा इतिहास ———— वि. का. राजवाडे

४. देवदासी व नग्न पुजा ———— उत्तम कांबळे
लोक वाङ:मय प्रकाशन, पुणे

५. दैनिक सकाळमधील लेख –


- * * * * * -




Co - Ordinator IQAC
Arts & Science Mahila Mahavidyalaya
Mehkar, Dist. Buldana

Scanned by TapScanner